# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक २९/०८/२०१७

***<u>अहेरी येथील अवैध दारू विक्रेता संजय राजय्या रत्नावार याचे विरूध्द मा. उच्च न्यायालयाने एम.पी.डी.ए.ॲक्ट अंतर्गत स्थानबध्दतेचा आदेश केला कायम</u>***

गडचिरोली जिल्हयातील मौजा अहेरी येथील अवैध दारू विक्रेता संजय राजय्या रत्नावार वय ४८ वर्ष हा सन-२००८ पासून गडचिरोली जिल्हयात अवैध दारू वाहतूक करणे, बाळगणे व विक्री करणे अशाप्रकारचे बेकायदेशिर कृत्य करीत असल्याने त्याचेविरूध्द आजपावेतो महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम सन-१९४९ अन्वये एकुण २६ गुन्हे दाखल आहेत. त्याचबरोबर एम.पी.डी.ए.चे कलम ९३ अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही ही करण्यात आलेली आहेत. जिल्हयात १०० टक्के दारूबंदी व्हावी याकरीता शासनाने नवनवीन योजना राबवून दारूबंदी कायदयात सुधारणा व्हावी याकरीता दारूबंदी सदराखालील दाखल गुन्हे अजामीनपात्र केलेले आहेत. तरीही सदर इसमाने अवैध दारूविक्रीचा व्यवसाय सोडला नाही. त्यामुळे सदर इसमास कायदयाचे कोणत्याही प्रकारचे भय नसल्याचे निदर्शनास आले होते. तसेच संजय रत्नावार हा अवैध दारू विक्री व्यवसायाच्या आधारे स्थानीक ठिकाणी दादागिरी करीत असल्याने सर्व सामान्य भोळयाभाबळया जनतेमध्ये त्याची दहशत पसरली होती. त्याचे गुंडगीरीचे स्वभावामुळे सामान्य नागरिक त्याचे विरोधात कोणत्याही प्रकारची तक्रार करण्यास धजावत नसल्याने त्याची हिम्मत वाढली होती. तसेच त्याच्या भितीमुळे लोक ये-जा करण्यासाठी आड मार्गाचा वापर करीत होते. त्याच्या दादागिरी कृत्यांमुळे जनजीवन विस्कळीत होवून सार्वजनीक सुव्यवस्थेला धोका निर्माण झाला होता.

अशा प्रकारच्या गुंडप्रवृत्तीच्या लोकांचे वर्तनास आळा बसविण्याकरीता त्याचेविरूध्द महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले व औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कालाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती (व्हीडीओ पायरट्स) वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ (सुधारणा २०१६) चे कलम ३(१) अन्वये स्थानबध्दतेची कार्यवाही करणे आवश्यक झाले होते. तसेच सदर इसमास एम.पी.डी.ए. प्रचलीत कायदयाचे कोणतेही भय राहीलेले नव्हते, त्यामुळे त्याचेकडून वेळोवेळी प्रचलित कायदयाची पायमल्ली होत होती. म्हणून मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख सो. यांनी अशाप्रकारचे इसमांविरूध्द महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले व औषधीद्राव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कालाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती (व्हीडीओ पायरट्स) वाळु तस्कर आणि

अत्यावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ (सुधारणा २०१६) चे कलम ३(१) अन्वये स्थानबध्दतेची कार्यवाही करण्याबाबत अहेरी पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. संजय मोरे यांना निर्देश दिले होते. स्थानबध्द इसम याचे स्थानबध्द प्रस्तावास मा. ए.एस.आर. नायक जिल्हादंडाधिकारी गडचिरोली यांनी मान्यता दिल्याने स्थानबध्द इसमास जिल्हा कारागृह चंद्रपूर येथे दाखल करण्यात आले आहे.

या स्थानबध्दतेच्या विरोधात संजय रत्नावार याने मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे क्रि. रिट पिटिशन क्रं. २२९/२०१७ अन्वये दाद मागीतली होती. या रिट पिटिशन संदर्भात शासनाची बाजु मांडणेकरीता मा. ए.एस.आर. नायक जिल्हादंडाधिकारी गडचिरोली व पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख यांनी दिलेल्या मार्गदर्शनानुसार शासनाचे वतीने वेळोवळी बाजु मांडण्यात आल्याने मा. उच्च न्यायालयाने स्थानबध्द इसमाची रिट पिटिशन रद्द करुन शासनाने दिलेला स्थानबध्दतेचा आदेश कायम केलेला आहे याकामी तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. संजय मोरे पोस्टे अहेरी, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. यशवंत नलावडे, पोहवा विनोद येनगंटीवार, पोहवा भाऊराव बोरकर, पोहवा प्रेमकुमार दुर्गे, चापोशि चंदु मोहुर्ले स्थागुशा गडचिरोली तसेच श्री. हेमंत बांबोळे, विधी अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली यांनी वेळोवळी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन स्थानबध्दतेचा आदेश कायम राहणेस आवश्यक कार्यवाही केली आहे.